N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** दौलताबाद पोलीस स्टेशन **Year (वर्ष):** 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0021 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 15/02/2022 18:50 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 15/02/2022
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/02/2022
**Time From (वेळेपासून):** 10:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/02/2022 **Time (वेळ):** 18:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 009 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/02/2022 18:36 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोस्टे दौलताबाद चे जुन्या ,इमारती जवळ बालाजी ट्रेडर्स , च्या समोरील रोडचे पलीकडे,दौलताबाद ता जि औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बाबासाहेब गोरखनाथ गुंजाळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामपुरी,ता जि औरंगाबाद,दौलताबाद पोलीस स्टेशन,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामपुरी,ता जि औरंगाबाद,दौलताबाद पोलीस स्टेशन,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9595468888**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविकिरण आगतराव कदम | | | 1. दगडु पैठणे यांचे घरी किरायाणे, दिपस्तंभ,औरंगाबाद रोड,दौलताबाद ता जि औरंगाबाद ,दौलताबाद पोलीस स्टेशन,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी बाबासाहेब गोरखनाथ गुंजाळ, वय 30 वर्षे, व्यवसाय- शेती, रा.रामपुरी, ता.जि.औरंगाबाद 9595468888.समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी दिनांक 14/02/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथील पो.नि.सुर्यवंशी मडम यांचेकडे लाचमागणी बाबतची लेखी तक्रार दिली होती, ती पुढील प्रमाणे - मी वरील प्रमाणे असुन तक्रार लिहून देतो की, माझे वडिल नामे गोरखनाथ गिरजाजी गुंजाळ यांचा दि. 27/01/2022 रोजी फतियाबाद येथे कार अपघातात मृत्यू झाला त्या संदर्भात पोलीस स्टेशन दौलताबाद येथे दिनांक 28/01/2022 रोजी गु.र.नं.10/2022 प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्या गुन्हाचा तपास पो.स्टे.दौलताबाद येथील पोलीस उप निरीक्षक कदम साहेब यांचे कडे आहे. दिनांक 13/02/2022 रोजी मी पोलीस स्टेशन दौलताबाद येथे जावुन पोउपनि श्री.कदम साहेब यांना भेटलो व माझे मयत वडीलांचा विमा क्लेम करण्यासाठी गुन्हयाचा पंचनामा व इतर कागदपत्रे देण्याची विनंती केली असता पोउपनि कदम हे मला म्हटले कि मी तुला सर्व कागदपत्र देतो परंतु ही अपघाताची केस आहे यामध्ये RTO ला आणि घाटी रुग्णालयातील डक्टरांना मनेज करावा लागते आणि स्पट पंचनामा करण्यासाठी RTO येतात तर तिथे पण त्यांना पैसे दयावे लागतात, मी त्यांना विचारले की, पैसे कशासाठी दयावे लागतात तर त्यांनी मला सांगितले की, समोरचे फायनान्स वाले खूप पैशावाले असतात ते RTO ला पैसे देवून गाडीचे ब्रेक फेल आहे असे पण दाखवू शकतात आणि घाटी रुग्णालयातील डक्टरांना पण पैसे देवून मृत्यू प्रमाणपत्रात तूझे वडिल दारू पिलेले होते असे दाखवू शकतात. मी दौलताबाद पो.स्टे. येथील पोउपनि कदम यांना 5000/- रुपये दिले आहे पण ते म्हटले की, एवढया पैश्यामध्ये काहिच होणार नाही आणि मला आणखी दहा- वीस हजार रुपये द्यावे लागतील असे म्हटले. माझी परिस्थिती एवढे पैसे देण्यासारखी नाही. तर ते मला म्हटले कि मग या केसला अनेक वर्ष लागु शकतात तरी मला कदम पोउपनि यांना पैसे देण्याची इच्छा नाही, मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन आलो आहे. माझा व पोउपनि कदम यांचा कुठलाही उसनवारीचा व्यवहार नाही व कोणतीही दुश्मनी किंवा वैर नाही.मी दिनांक 14/02/2022 रोजी पोउपनि कदम यांना भेटुन पंचनामे व कागदपत्रांची मागणी करणार आहे त्यावेळी त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन ती स्वत:किंवा इतरांमार्फत स्विकारल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी हि विनंती.माझे वरील तक्रारीवरुन अँन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद येथील पोलीस निरीक्षक सुर्यवंशी मँडम यांनी मी दिलेल्या तक्रारीची शहानिशा करण्यासाठी लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे दिनांक 14/02/2022 रोजी माझ्या सोबत पंच क्र.01 श्री.सुरेश धाबर्डे यांना सोबत देऊन माझ्याकडे पंचासमक्ष व्हाईस रेकर्डर चालु करुन देऊन मला दौलताबाद पोलीस स्टेशनचे पोउपनि श्री.कदम यांची भेट घेण्यासाठी पाठविण्यात आले.त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 धाबर्डे असे दौलताबाद पोलीस स्टेशनच्या जुन्या इमारतीजवळ जाऊन श्री कदम, पोउपनि यांचे मोबाईल फोन वर फोन केला असता पोउपनि कदम यांनी मी तिकडेच येतो असे सांगीतले व थोड्या वेळाने पोउपनि कदम हे मी थांबलेल्या ठिकाणी आले तेथे माझी व पोउपनि कदम यांची भेट झाली. त्यावेळी मी पोउपनि श्री.कदम यांना

अपघातात मयत झालेले माझे वडील यांचे अपघात विमा मंजुर करण्यासाठी आवश्यक असलेले अपघाताचे पंचनामे व इतर कागदपत्रे कधी मिळतील याबाबत विचारले असता त्यांनी माझ्याकडे माझ्या सोबतच्या पंचासमक्ष 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले व लाचेची रक्कम माझे भाऊ काकासाहेब (पोलीस पाटील) यांचे कडे देण्याचे सांगितली. त्यावरुन अँन्टी करप्शन ब्युरोच्या सुर्यवंशी मडम यांनी पोउपनि कदम यांना देण्यासाठीच्या पैशाबाबत मला विचारले असता मी त्यांना माझ्याकडे सध्या लाचेची पुर्ण रक्कम नसुन उदया दिनांक 15/02/2022 रोजी मी पैशांची व्यवस्था करतो व मी स्वत:च पोउपनि कदम यांना दौलताबाद पोलीस स्टेशनचे जुन्या इमारतीजवळ जावुन भेटुन लाचेचे पैसे देतो असे सांगीतल्याने दिनांक 15/02/2022 रोजी पुढील सापळा कारवाई करण्याचे पंचासमक्ष ठरले.आज दिनांक 15/02/2022 रोजी पोउपनि श्री.कदम यांना ठरल्याप्रमाणे पैसे देण्याच्या पुढील कारवाईसाठी पो.नि सुर्यवंशी मँडम,पंच, व त्यांचे पथकासह दौलताबाद पोलीस स्टेशन चे अलीकडील परीसरात सुरक्षित ठिकाणी हजर होते. पो.नि.सुर्यवंशी मँडम यांच्याकडे माझेकडील 10,000/-रुपये ज्यात 500/-रुपये दराच्या 20 नोटा हजर केल्या. त्यानंतर त्यांनी त्या नोटांना पावडर लावुन, व्हाईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे दिला. त्यानंतर पंच श्री धाबर्डे यांना सोबत देऊन पोउपनि श्री.कदम यांना त्यांनी मागितल्याप्रमाणे 10,000/- रुपये देण्यासाठी पो.स्टे. दौलताबादचे जुन्या इमारतीजवळ पाठविले. त्याप्रमाणे पंच क्र.1 धाबर्डे व मी असे माझे खाजगी मोटार सायकलवर पो.स्टे.दौलताबादचे जुन्या इमारतीजवळ जाऊन पोउपनि श्री.कदम यांना त्यांचे मोबाईल वर संपर्क केला असता त्यांनी मला पाच मिनीटे थांब आलोच असे सांगीतले व थोडयाच वेळात पोउपनि कदम हे पो.स्टे. दौलताबादचे जुन्या इमारतीजवळ बालाजी ट्रेड्रर्सच्या समोरील रोडचे पलीकडे आले तेथे माझी व पोउपनि श्री.कदम यांची भेट झाली तेथे आमचे कामा संबधाने चर्चा केली व लाच मागणीत ठरल्या प्रमाणे 10,000/- रुपये माझ्या खिशातुन काढुन पोउपनि श्री. कदम यांचे समोर धरली असता सदर लाचेची रक्कम त्यांनी त्यांचे उजव्याहाताने स्विकारुन त्यांचे नेसनिस असलेल्या खाकी पँटचे मागील उजव्या खिशामध्ये ठेवले त्याचवेळी मी माझ्या तोंडावरील मास्क काढुन सापळा पथकास लाच स्विकारले बाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर तात्काळ सापळा पथकाने पोउपनि श्री.कदम यांना पकडुन त्यांचे कडुन लाचेची रक्कम जप्त केली . त्यानंतर पो.नि.सुर्यवंशी मँडम यांनी पोउपनि कदम यांना त्यांचे नाव,गाव व पद विचारले असता त्यांनी त्यांचे नाव रविकिरण आगतराव कदम, वय 38 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद-पोलीस उप निरीक्षक, पो.स्टे.दौलताबाद, औरंगाबाद शहर, रा.दिपस्तंभ,औरंगाबाद रोड, दौलताबाद ता.जि. औरंगाबाद (श्री.दगडु पैठणे यांचे घरी किरायाणे) असे सांगीतले.पोउपनि श्री.कदम यांनी माझ्या कडे अपघातात मयत झालेले माझे वडील यांचे विमा मंजुर करण्यासाठी आवश्यक असलेले अपघाताचे पंचनामे व इतर कागदपत्रे देण्यासाठी पंचा समक्ष 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्वत:चे आर्थिक फायदयासाठी दिनांक 15/02/2022 रोजी सकाळी 10.10 वाजता पो.स्टे.दौलताबादचे जुन्या इमारतीजवळ बालाजी ट्रेड्रर्सच्या समोरील रोडचे पलीकडे माझेकडुन 10,000/- रुपये लाच स्वत:पंचासमक्ष स्विकारली म्हणुन श्री.रविकिरण आगतराव कदम, पोलीस उप निरीक्षक,पो.स्टे.दौलताबाद, औरंगाबाद शहर यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): RAJSHRI GANPATRAO ADE(I (Inspector)) / 13101000450RGAF8101 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे ... औरंगाबाद शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name (नाव):** RAJSHRI GANPATRAO ADE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 13101000450RGAF8101

H.U. धाडे. HC-1784.